जुन्या रोजगार हमी योजनेची शासनमान्य
यादीतील अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी
दि. ३०.६.२०१५ पर्यंत मुदतवाढ देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग (रोहयो)
शासन निर्णय क्रमांक : रोहयो-२०१२/प्र.क्र.१०३/रोहयो-८
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : ३० डिसेंबर, २०१४.

वाचा:-
१) शासन निर्णय क्र. मग्रारोहयो - २००८/प्र.क्र.२८/रोहयो-६, दि. ३०.६.२००९.
२) शासन निर्णय क्र. मग्रारोहयो - २००८/प्र.क्र.२८/रोहयो-६, दि. २४.७.२०१०.
३) शासन निर्णय क्र. रोहयो - २०१०/प्र.क्र.३३३/रोहयो-८, दि. १८.३.२०११.
४) शासन निर्णय क्रमांक : रोहयो - २०१२/प्र.क्र.१०३/रोहयो-८, दि. ३१.१०.२०१२.
५) शासन निर्णय क्रमांक : रोहयो - २०१२/प्र.क्र.१०३/रोहयो-८, दि. १९.९.२०१३.
६) शासन निर्णय क्रमांक : रोहयो - २०१२/प्र.क्र.१०३/रोहयो-८, दि. ३.७.२०१४.

प्रस्तावना :-

महाराष्ट्र राष्ट्रीय रोजगार हमी अधिनियम, २००५ अंतर्गत महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना दि. १.४.२००८ पासून सर्व जिल्हयांत लागू झाली आहे. दि. १.४.२००८ रोजी जुन्या रोजगार हमी योजनेतील जी कामे अपूर्ण आहेत, त्याबाबतच्या यादया संबंधित जिल्हाधिकारी यांनी शासनास सादर केल्या होत्या. त्यावर शासन स्तरावर निर्णय घेऊन सदर कामे जुन्या रोजगार हमी योजनेप्रमाणे पूर्ण करण्याचा निर्णय घेण्यात आला व त्यानुसार संदर्भाधिन अनुक्रमांक. १ ते ३ येथील दि. ३०.६.२००९, दि. २४.७.२०१० व दि. १८.३.२०११ चे आदेश निर्गमित करण्यात आले. सदर आदेशांनुसार रस्त्याची एकूण ५७८६ एवढी कामे व पाझर तलावाची एकूण ४,३४९ एवढी कामे अशी एकूण १०,१३५ कामे पूर्ण करण्यास मान्यता दिली होती. सदर कामे ३ वर्षांचा कालबध्द कार्यक्रम आखून पुर्ण करणे आवश्यक होते. ही मुदत दि. ३०६.२०१२ पर्यंत होती.

दरम्यान दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर सदर कामे पूर्ण करण्यासाठी दि. ३०.६.२०१३ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. या वाढीव मुदतवाढीमध्ये किती कामे पूर्ण झाली व किती कामे अपूर्ण आहेत याबाबतची माहिती सर्व विभागीय आयुक्त यांच्याकडून मागविण्यात आली होती. तसेच प्रधान सचिव (रोहयो) यांच्या अध्यक्षतेखाली दि. २२.८.२०१३ रोजी सर्व विभागीय आयुक्त कार्यालयातील उपायुक्त (रोहयो), कार्यकारी अभियंता व लेखा अधिकारी यांच्यासमवेत बैठक घेऊन आढावा घेण्यात आला. यामध्ये अजूनही काही कामे अपूर्ण असल्याचे निदर्शनास आले. सदर कामातील अकुशल भाग पुर्ण झाला असून कुशल भाग शिल्लक राहिलेला आहे. या कामातील अकुशल भागावर शासनाचा निधी खर्च झालेला आहे. सदर निधी वाया जाऊ नये म्हणून ज्या अपूर्ण कामांना शासनाने मान्यता दिलेली आहे, अशी अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी संदर्भिय अनुक्रमांक ५ येथील दि. १९.९.२०१३ च्या शासन निर्णयान्वये दि. ३०.६.२०१४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. ती सदंर्भिय अनुक्रमांक ६ येथील शासन निर्णयान्वये दि. ३१.७.२०१४ पर्यंत करण्यात आली होती.

सदर कामाबाबत दि. ६.८.२०१३ रोजी सर्व जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्त यांना एक प्रश्नावली पाठविण्यात आली होती. या प्रश्नावलीमध्ये अपूर्ण कामाबाबत माहिती भरून ती शासनास सादर करण्याचे कळविले होते या प्रश्नावलीच्या आधारे प्राप्त झालेल्या माहितीनुसार सदर प्रकरणी जुन्या

रोहयोतून वगळलेली कामे व पूर्ण झालेली कामे सोडून शासनमान्य यादीतील निव्वळ ८७८ कामे शिल्लक असल्याचे निदर्शनास आले. या कामापैकी दि. ३१.७.२०१४ रोजी ३६३ कामे पूर्ण झाल्याचे, २३८ कामे वगळल्याचे निदर्शनास आले त्यामुळे या ८७८ कामांपैकी २७७ कामे अदयापही शिल्लक आहेत.

अशा अपूर्ण कामांबाबत दि. १९.११.२०१४ रोजी सचिव (रोहयो) यांच्या अध्यक्षतेखाली उपायुक्त (रोहयो) यांची बैठक घेण्यात आली. त्यानुसार ज्या अपूर्ण कामांना शासनाने मान्यता दिलेली आहेत व जी कामे दि. ३१.७.२०१४ रोजी अपूर्ण / शिल्लक आहेत फक्त तीच कामे जुन्या रोजगार हमी योजनेच्या पध्दतीनुसार पूर्ण करण्यास मुदतवाढ देण्याबाबत चर्चा करण्यात आली. त्यानुसार मुदतवाढ देण्याची बाब विचाराधीन होती. वरील पार्श्वभूमीवर पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय :-**

संदर्भिय शासन निर्णयानुसार अपूर्ण कामे पूर्ण करण्यास दिलेल्या मान्यतेमधील शासनमान्य यादीतील वगळलेली व पुर्ण झालेली कामे सोडून जी निव्वळ ८७८ कामे शिल्लक होती त्यापैकी दि. ३१.७.२०१४ रोजी अपूर्ण / शिल्लक असलेली फक्त २७७ कामे जुन्या रोजगार हमी योजनेच्या पध्दतीनुसार पुर्ण करण्यास दि. ३०.६.२०१५ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. या २७७ कामाबाबतचे विवरणपत्र सोबत जोडण्यात आले आहे. त्यानुसार संबंधित जिल्हयाने पुढाकार घेऊन कालबद्ध कार्यक्रम आखून अपूर्ण कामे विहीत मुदतीत पुर्ण करावीत. जेणेकरुन या कामावर पूर्वी झालेला खर्च वाया जाणार नाही व ही कामे पूर्णत्वास जातील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(आर विमला)
उप सचिव (रोहयो), महाराष्ट्र शासन
30/12/2014

प्रति,
मा. राज्यपाल यांचे सचिव
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा. मंत्री (रोहयो व जलसंधारण) यांचे खाजगी सचिव
सर्व मा. मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य
सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
उप सचिव, विधानमंडळ रोहयो समिती (४० प्रती)
सर्व मंत्रालयीन विभाग
सचिव (रोहयो) यांचे स्वीय सहाय्यक
सर्व उप सचिव / अवर सचिव / कार्यासन अधिकारी (रोहयो प्रभाग) / निवड नस्ती, रोहयो-८.

शासन निर्णय, नियोजन विभाग (रोहयो) क्रमांक : रोहयो-२०१२/प्र.क्र.१०३/रोहयो-८,
दि. ३० डिसेंबर, २०१४ सोबतचे विवरण पत्र.

| अ.क्र. | प्रश्नावली अंती जिल्ह्यातील निव्वळ शिल्लक कामांची संख्या | जिल्हाधिकारी यांच्याकडील पत्र क्रमांक व दिनांक | दि.३१/७/२०१४ रोजी पूर्ण/ वगळलेल्या कामांची संख्या | | | दि. ३१/७/२०१४ रोजी शिल्लक कामांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | पूर्ण | वगळलेली | एकूण | |
| १ | औरंगाबाद (६३) | जा.क्र.२०१४/ग्राभूरोहका/तांत्रिक/१५३३/कावि- , दि. ७.८.२०१४. | २५ | ८ | ३३ | ३० |
| २ | जालना (६२) | जा.क्र.२०१४/मग्रारोहयो/कार्या-५, सीआर, दि. २०.८.२०१४. | १२ | ३१ | ४३ | १९ |
| ३ | परभणी (१६) | जा.क्र.जि.प./ल.पा.वि./लेखा-३/७३४, दि. ६.८.२०१४. | ३ | ५ | ८ | ८ |
| ४ | लातूर (४७) | जा.क्र.२०१४/रोहयो/कक्ष-२/कावि/११०९, दि. ८.८.२०१४. | ३५ | १ | ३६ | ११ |
| ५ | उस्मानाबाद (१०१) | जा.क्र.२०१४/मग्रारोहयो/तां.शा./सीआर-१, दि.१६.८.२०१४. | २४ | - | २४ | ७७ |
| ६ | हिंगोली (१२) | जा.क्र.२०१४/मग्रारोहयो/कावि, दि. ११.८.२०१४. | ८ | ३ | ११ | १ |
| ७ | नांदेड (५३) | जा.क्र.२०१४/रोहयो/तां.शा./अपूर्ण कामे/९९४/ दि. १४.८.२०१४. | ३ | १४+३६ | ५३ | ० |
| ८ | बीड (४२७) | जा.क्र.२०१४/मग्रारोहयो/तांत्रिक/२०१४, दि. १४.८.२०१४. | २२१ | १३१ | ३५२ | ७५ |
| | **७८१** | | **३३१** | **२२९** | **५६०** | **२२१** |
| ९ | अहमदनगर (५) | क्र.रोहयो/कार्या-१८(५)/२१६/२०१४, दि. ५.८.२०१४. | १ | - | १ | ४ |
| १० | जळगाव (२४) | क्र.मग्रारोहयो/उपअभि/कावि-१०३/२०१४, दि. १३.८.२०१४. | २ | - | २ | २२ |
| ११ | धुळे (३) | क्र.रोहयो/जि-३/कावि/५२२/२०१४, दि. १३.८.२०१४. | ० | ० | ० | ३ |
| १२ | नाशिक (२३) | क्र.कक्ष-११/रोहयो-८/१७८/२०१४, दि. ६.८.२०१४. | १ | ० | १ | २२ |
| १३ | नंदूरबार (६) | क्रमांक/मग्रारोहयो/दप/२६१/२०१४, दि. ५.८.२०१४. | ५ | १ | ६ | ० |
| | **६१** | | **९** | **१** | **१०** | **५१** |
| १४ | अकोला (१) | क्र.कक्ष-२१/रोहयो/दप/कावि-२३४/१४, दि. १४.८.२०१४. | ० | ० | ० | १ |
| १५ | यवतमाळ (१५) | क्र.ता.शा./रोहयो/कावि/३८/२०१४, दि. २५.०८.२०१४. | १३ | ० | १३ | २ |
| १६ | बुलढाणा (४) | दि.५.८.२०१४ चा ई-मेल | ० | ४ | ४ | ० |
| | **२०** | | **१३** | **४** | **१७** | **३** |
| १७ | सांगली (३) | जा.क्र.रोहयो/कार्या-१३/आरआर-२/३३७/२०१४, दि. ११.८.२०१४. | ३ | ० | ३ | ० |
| | **३** | | **३** | **०** | **३** | **०** |
| १८ | भंडारा (११) | क्र.जिकाभं/रोहयो/तांत्रिक/कावि-९९३/२०१४, दि. ८.८.२०१४. | ७ | ४ | ११ | ० |
| | **११** | | **७** | **४** | **११** | **०** |
| १९ | रत्नागिरी (२) | क्रमांक.मग्रारोहयो-१/जुनीरोहयो/कामे/सदयस्थिती/ ८-१४, दि. १३.८.२०१४. | ० | ० | ० | २ |
| | **एकूण (८७८)** | | **३६३** | **२३८** | **६०१** | **२७७** |